# <u>प्रसिध्दी पत्रक</u>

**श्री.विजयानंद बळवंतराव डोरणाळीकर, वय 40 वर्ष, व्यवसाय-कामगार, महावितरण उपकेंद्र माळुंब्रा, ता. तुळजापुर यांनी 2500/- रुपये लाच रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग उस्मानाबाद च्या जाळयात**

| | |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव, हुद्दा व पत्ता | श्री.विजयानंद बळवंतराव डोरणाळीकर, वय 40 वर्ष, व्यवसाय-कामगार, महावितरण उपकेंद्र माळुंब्रा, ताञ तुळजापुर |
| गुन्हयाचा दिनांक व ठिकाण | दि.25.02.2020 रोजी पंचायत समिती तुळजापुरचे विरुध्द बाजुस असलेल्या ठाकरे झेरॉक्स समोर |
| तपासी अधिकारी | श्री.गौरीशंकर पाबळे, पोलीस निरीक्षक |
| लाचेची रक्कम मागणी | 30,000/- रु लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 20000/- रु लाचेची मागणी केली व पहिल्या हप्ता 2500/- रु स्विकारले |
| लाच मागण्याचा हेतु | शेतातील वीज कनेक्शन जोडुन देण्यासाठी |

यातील तक्रारदार हे शेती व्यवसाय करीत आहेत. तक्रारदार यांच्या शेतात वीज कनेक्शन देण्यासाठी यातील महावितरणचे मुकादम (कामगार) श्री.डोरणाळीकर यांनी तक्रारदार यांचेकडे 30,000/- रुपये लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना श्री. डोरणाळीकर, महावितरणचे मुकादम (कामगार) यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दि.14.02.2020 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद येथील पोलीस निरीक्षक श्री. गौरीशंकर पाबळे यांचेकडे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने श्री.डोरणाळीकर यांची लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे वरील नमुद कारणासाठी दि.14.02.2020 रोजी पंचासमक्ष 30,000/-रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 20,000/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे दि.25.02.2020 रोजी सापळा आयोजीत केला असता **श्री.विजयानंद बळवंतराव डोरणाळीकर, महावितरण मुकादम** (कामगार) यांनी तुळजापुर येथे तक्रारदार यांच्याकडुन लाचेच्या मागणीप्रमाणे 20000/- रुपये पैकी पहिला हप्ता 2500/- रुपये लाच रक्कम स्वतः स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. यावरुन त्यांचेविरुध्द पोलीस ठाणे तुळजापुर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री.अरविंद चावरीया, मा.अपर पोलीस अधीक्षक डॉ.अनिता जमादार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.गौरीशंकर पाबळे, पोलीस निरीक्षक यांनी केली असुन सदर कारवाईस पोह/कठारे, पोना/जाधव, पोशि/बेळे, पवार,शिंदे, व चालक कांबळे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी 1) महाराष्ट्र शासनाचे मानधन, अनुदान घेणारी व्यक्ती 2) खाजगी इसम शासकिय कामाकरिता अथवा शासकीय काम करुन दिले बद्दल लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाईल, दूरध्वनीवर, टोल फ्री क्रमांकावर, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे <u>**मोबाईल ॲप्सद्वारे www.acbmaharashtra.net**</u> या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

**मोबाईल क्रमांक :-**

**1)** मा.श्री.अरविंद चावरीया, पोलीस अधीक्षक, ला.प्र.विभाग, औरंगाबाद मोबाईल क्रं. 8530255500

**2)** श्री.गौरीशंकर पाबळे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद मो.नं. 8888813720,

**3) टोल फ्री क्र. 1064**, दूरध्वनी क्र.- 02472-222879

<u>**E-Mail ID:-**</u>dyspacbosmanabad@mahapolice.gov.in, 2)dysposmanabad@gmail.com

कार्यालय पोलीस उप अधिक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,उस्मानाबाद

सत्यमेव जयते

25/2/2020

**(गौरीशंकर पाबळे)**
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद.